

आदर्श शिक्षक पुरस्काराची रक्कम २५ हजार!

पान : मुंबई

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED



हरमनप्रीत-दीप्तीचे शतक; भारताचा मालिका विजय

पान : क्रीडा

मुंबई ● सोमवार, २६ ऑक्टोबर २०२६ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २३ ● अंक १८ ● पाने १० ● ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in



Ministry of Home Affairs
Government of India

CBC 19101/13/0019/2627

देश भक्तीच्या मार्गावरून एकता नगरकडे प्रवास करू या

अंतर्गत सुरक्षा दलांचा सन्मान

एकाच जागी पहा, एकतेचे रंग अनेक

राष्ट्रीय एकता दिवस
३१ ऑक्टोबर २०२६
एकता नगर, गुजरात

भारत पर्व
१ ते १५ नोव्हेंबर २०२६,
एकता नगर, गुजरात

Rashtriya Ekta Diwas 31st OCTOBER, 2026 Statue of Unity, Ekta Nagar, Gujarat

माहितीसाठी आणि निवासाच्या बुकिंगसाठी, स्कॅन करा किंवा rashtriyaektadiwas.com ला भेट द्या.



श्री नरेन्द्र मोदी
माननीय पंतप्रधान




## वेचक

### पंतप्रधानांच्या उपस्थितीत वाराणसीत 'एअर शो'

**वाराणसी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी वाराणसी येथील नमो घाटावर आयोजित 'एयर फोर्स डे एअरियल डिस्प्ले-२०२६' (एअर शो) ला मुख्य अतिथी म्हणून उपस्थिती लावली. भारतीय हवाई दलाच्या ९४ व्या वर्धापन दिनानिमित्त "गंगा आणि उड्डाण" या संकल्पनेवर आधारित या चित्तथरारक एअर शोचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे देखील उपस्थित होते.

### दिल्लीतील कायदा-सुव्यवस्थेचा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून आढावा

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आणि मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या समवेत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. राष्ट्रीय राजधानीत होणारी मोठी गर्दी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी दिल्ली पोलिसांच्या तयारीचा त्यांनी आढावा घेतला. दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### 'अर्णव' चक्रीवादळ आंध्रप्रदेश किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता

**विशाखापट्टणम :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले खोल कमी दाबाचे क्षेत्र सोमवार सकाळपर्यंत तीव्र होऊन चक्रीवादळात रूपांतरित होण्याची दाट शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, २८ ऑक्टोबर रोजी दुपारपर्यंत हे अत्यंत तीव्र चक्रीवादळ बापटला आणि विशाखापट्टणम दरम्यान आंध्र प्रदेश व यानमच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या चक्रीवादळादरम्यान ताशी ११५ ते १२५ किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे.

# 'मन की बात'ची तपसाधना

## देशवासीयांना वंदन करण्याचा अनुभव तीर्थयात्रेइतकाच पवित्र : पंतप्रधान मोदी

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

आजपासून १२ वर्षांपूर्वी, विजयादशमीच्या पवित्र मुहूर्तावर आपण 'मन की बात' या कार्यक्रमाची सुरुवात केली होती. तेव्हापासून आजपर्यंत हा प्रवास सातत्याने सुरू आहे. या प्रवासाचे सहप्रवासीही तुम्हीच आहात आणि मार्गदर्शकही तुम्हीच आहात. माझ्यासाठी 'मन की बात' हा देशातल्या सामान्य माणसाच्या परिश्रमांचा, पराक्रमाचा, त्याच्या प्रतिबद्धतेचा, समर्पणाचा आणि सेवाभावाचा गौरव करण्याची एक चांगली संधी म्हणून समोर आला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. 'मन की बात'च्या १३९ व्या भागातून त्यांनी देशवासियांशी संवाद साधला.

सणांच्या काळात आपण आपल्या प्रियजनांसाठी अनेक वस्तू खरेदी करतो. यंदाही खरेदी करताना स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंना प्राधान्य द्या. तुमच्या खरेदीमुळे त्यांचा उत्साह वाढेल. तुमच्या या आपुलकीमुळे 'व्होकल फॉर लोकल' अभियानाला आणखी बळ मिळेल. हे



अभियान जितक्या वेगाने पुढे जाईल, तितक्याच वेगाने आत्मनिर्भर भारताचे स्वप्नही साकार होईल. स्थानिक कारागिरांच्या उत्पादनांना अधिक प्राधान्य द्या, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. आपल्या देशात शतकानुशतके तीर्थयात्रेची परंपरा चालत आली आहे. माझ्यासाठी 'मन की बात' हा कार्यक्रम देखील देशातल्या लोकांच्या योगदानाला वंदन करण्याचा तीर्थयात्रेइतकाच पवित्र अनुभव आहे. जे लोक समाजासाठी आणि राष्ट्रासाठी जगतात, ते स्वतःमध्येच एका तीर्थस्थळासारखे असतात. गेल्या १२ वर्षांत देशाच्या कानाकोपऱ्यातून असे अनेक लोक समोर आले आहेत, ज्यांच्या असाधारण कार्यांकडे समाजाचे कधी लक्ष जात नाही, असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

१ जेव्हा समाज अशा भावनेने एकजुटीने काम करतो, तेव्हा परिवर्तनाची हमी निश्चित होते. याची एक झलक आपल्याला आपल्या सण-उत्सवांमध्येही पाहायला मिळते.

२ **अवघ्या काही दिवसांत दिवाळी आणि छठ या पवित्र सणांचे आगमन होणार आहे. या सणांच्या निमित्ताने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. आपण जिथे राहतो, त्या परिसराच्या स्वच्छतेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.**

३ आता लोक स्वदेशी उत्पादनांना अधिक महत्त्व देत आहेत. 'व्होकल फॉर लोकल'ही भावना आपल्या उत्पादनांना जगभरातल्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवत आहे.

- या कार्यक्रमाच्या माध्यमातून मी एकप्रकारे देशातल्या लोकशक्तीची आराधना करतो. या कार्यक्रमामुळे मला देशातल्या प्रत्येक कुटुंबाशी जोडले जाण्याची संधी मिळते.
- **मला शंभरपेक्षा जास्त असे संदेश आलेत, ज्यामध्ये लोक सांगतात की, 'मन की बात' ऐकल्यानंतर त्यांना असे वाटतं की, जणू मी त्यांच्यामध्ये, त्यांच्या कुटुंबात बसून, कुटुंबातल्या एका सदस्याप्रमाणे त्या सर्वांशी संवाद साधत आहे.**
- आपल्या देशात निसर्गाप्रती आदर बाळगण्याची अतिशय प्राचीन परंपरा आहे. देशातल्या अनेक लोकांनी ही भावना आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवली आहे.

### आदिवासींच्या स्टार्टअपचे कौतुक

- महाराष्ट्रातल्या आदिवासी समुदायांनी स्वतः तयार केलेल्या उत्पादनांच्या पॅकेजिंगवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.
- **येथे 'शबरी नेचुरल्स' या उपक्रमाच्या माध्यमातून मध, मोहफुले, चारोळी आणि बांबूपासून तयार केलेली उत्पादने बाजारात आणली जात आहेत. त्यांच्या पॅकेजिंगवर आदिवासी कलेची सुंदर छाप दिसून येते.**
- या पॅकेजिंगला जपानचा प्रतिष्ठित 'गुड डिझाइन पुरस्कार' मिळाला आहे, असेही पंतप्रधानांनी सांगितले.

# भारताच्या तरुणाईशी खेळणाऱ्यांना सोडणार नाही

## अमित शाहांचा 'नार्को-कार्टेल' तस्करांना इशारा

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी केंद्रीय तपास यंत्रणा तसेच आसाम, मिझोराम आणि मणिपूर पोलिसांच्या संयुक्त यशस्वी कारवाईचे कौतुक केले. आंतरराष्ट्रीय सीमांचा फायदा घेऊन भारताच्या युवा पिढीला हानी पोहोचवणाऱ्या कोणत्याही टोळीला सोडले जाणार नाही, असा कडक संदेश त्यांनी दिला.

अमित शाह यांनी 'एक्स'वर लिहिले की, "मोदी सरकारने 'ऑपरेशन ट्रायडंट' राबवून आंतरराष्ट्रीय नार्को-कार्टेलला मोठा धक्का दिला आहे. २३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय सुरक्षा यंत्रणा आणि राज्य पोलिसांच्या संयुक्त मोहिमेअंतर्गत आसाम, मिझोराम आणि मणिपूरमधील ३८ वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळी जोरदार छापेमारी करून तस्कर टोळीचे संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त केले आहे.

'ऑपरेशन ट्रायडंट'दरम्यान सुमारे १०० कोटी रुपयांच्या हवाला व्यवहारांची माहिती समोर आली आहे. या नेटवर्कशी संबंधित १,४२४ बँक खाती तातडीने गोठवण्यात आली आहेत, तर १७.८२ कोटी रुपये किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. छापेमारीदरम्यान ५०० डेटोनेटर्स आणि १२ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.



### डेथ ट्रँगल कॉरिडॉर

- **तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हे आंतरराष्ट्रीय नार्को-सिंडिकेट 'डेथ ट्रँगल कॉरिडॉर'चा वापर करून भारत, म्यानमार आणि बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय सीमांमार्गे अमली पदार्थांची बेकायदेशीर तस्करी करत होते.**

# गोदाकाठावर शंखनादाचा विश्वविक्रम

## ५१७ जणांनी एकाच वेळी फुंकले शंख; सिंहस्थ कुंभमेळ्याची नांदी

◆ **नाशिक (प्रतिनिधी) :**

गोदावरीच्या पवित्र तीरावर ५१७ जणांनी एकाच वेळी शंखनाद करत नाशिकच्या शिरपेचात विश्वविक्रमाचा मानाचा तुरा खोवला. अमेरिकेतील ३०३ शंखवादकांचा यापूर्वीचा विक्रम मोडत नाशिकने नवा विक्रम प्रस्थापित केला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी ऋषिकेश नाग यांनी विक्रमाची घोषणा करताच 'भारत माता की जय'च्या जयघोषाने गोदाकाठ दुमदुमला. सिंहस्थ कुंभमेळा २०२७च्या मंगल पर्वाची ही आध्यात्मिक नांदी ठरली.

नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण आणि अनंत विजय शंखनाद पथक यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागरी पौर्णिमेनिमित्त यशवंतराव महाराज पटांगण, गोदाकाठ येथे सामूहिक शंखनादाचे आयोजन केले होते. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमाला साधू-महंत, शंखनाद वादक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी महापौर हिमगौरी आडके आहेर, आ. राहुल ढिकले, आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नाशिक :** गोदावरीच्या पवित्र तीरावर ५१७ जणांनी एकाच वेळी शंखनाद करत अमेरिकेतील ३०३ शंखवादकांचा यापूर्वीचा विक्रम मोडत नाशिकने नवा विक्रम प्रस्थापित केला. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या मंगल पर्वाची ही आध्यात्मिक नांदी ठरली.

# कर्जतमधील टॉरंट प्रकल्प पर्यावरणपूरकच

## विरोधकांचे 'फेक नरेटिव्ह' महाराष्ट्रविरोधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित असलेल्या टोरेंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत विरोधकांनीसरकारवर निशाणा साधला होता. या वादावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट प्रतिक्रिया देत विरोधकांचा आरोप खोडून काढला आहे. "कर्जत पंप स्टोरेज प्रकल्प हा संपूर्णपणे पर्यावरणाला पूरक असाच प्रकल्प असून विरोधकांकडून केवळ फेक नरेटिव्ह पसरवण्याचे काम सुरू आहे, असा जोरदार हल्लाबोल मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, खोटा नरेटिव्ह तयार करणे म्हणजे महाराष्ट्रविरोधी कृत्य आहे. या प्रकल्पामुळे कोणाचीही



उपजीविका नष्ट होणार नाही आणि जर तशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यांच्या पुनर्वसनाचा योग्य विचार केला जाईल. हा संपूर्ण प्रकल्प कायद्याच्या चौकटीत राहूनच पूर्ण केला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, "समाजातील सर्व घटकांचा विचार करूनच या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु, केवळ राजकीय स्वार्थापोटी या विकासात्मक प्रकल्पाला विरोध केला जात असेल, तर ते अत्यंत अयोग्य आहे."

### प्रकल्पाबाबत सरकारचा खुलासा

- **हा गुजरातचा प्रकल्प नसून महाराष्ट्राचाच आहे आणि यातील गुंतवणूक, रोजगार व निर्माण होणारी वीज सर्वकाही महाराष्ट्रालाच मिळणार आहे.**
- **या प्रकल्पातून तब्बल ३०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून महाराष्ट्राला १२,००० मेगावॅट स्वच्छ वीज उपलब्ध होणार आहे.**
- **हा प्रकल्प कोळशावर आधारित नसून सौर ऊर्जेवर आधारित असल्याने पर्यावरणाचे नुकसान न होता तो पर्यावरणाला पूरक ठरणार आहे.**
- **प्रकल्पासाठी २३३ हेक्टर जमीन लागणार असल्याने कंपनीने आधीच वन विभागाला २५३ हेक्टर जमीन सुपूर्द केली असून, या क्षेत्रात टॉरेंट कंपनी ६०,००० आणि वन विभाग ३०,००० अशी एकूण ९०,००० नवी झाडे लावणार आहे.**
- **तसेच हा प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून १६ किमी आणि ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किमी दूर असून, हा सर्व भाग इको-सेन्सिटिव्ह झोनच्या बाहेर आहे.**
- **या प्रकल्पामुळे वर्षाला ४.६ दशलक्ष टन कोळशाचे ज्वलन आणि ४० लाख वाहनांच्या कार्बन उत्सर्जनाइतके प्रदूषण टळणार आहे, तसेच दरवर्षी १९.७ अब्ज लिटर कूलिंग वॉटरची बचत होणार आहे, जे ४ लाख लोकांसाठी पुरेसे असते.**

# नाशिकचा सिंहस्थ म्हणजे सनातन संस्कृतीचा अनोखा आविष्कार - महंत भक्तिचरणदास महाराज

## सिंहस्थ कुंभमेळा

**सुहास शेलार**

सिंहस्थ कुंभमेळा ही सनातन धर्माची प्राचीन परंपरा असून, समुद्रमंथन आणि अमृतकुंभाशी संबंधित पौराणिक मान्यतांमधून या पर्वाचे महत्त्व अधोरेखित होते. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पावसाळ्यात होणारा सिंहस्थ, शैव आणि वैष्णव आखाड्यांची परंपरा तसेच गोदावरीच्या तीरावरील धार्मिक आणि नैसर्गिक वैशिष्ट्ये यांमुळे या कुंभमेळ्याचे वेगळेपण असल्याचे अखिल भारतीय वैष्णव परिषदेचे प्रवक्ते महंत भक्तिचरणदास महाराज यांनी सांगितले. नाशिकला भारताची आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या इच्छेला संत-महंत आणि आखाडा परिषद सहकार्य करतील, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. सिंहस्थाची परंपरा, आखाड्यांची स्थापना, स्नानाची क्रमवारी आणि नाशिकच्या धार्मिक महत्त्वाविषयी त्यांनी 'दै. प्रहार'शी संवाद साधला.



**प्रश्न : कुंभपर्वाला काही दिवसांत सुरुवात होणार आहे. सर्वसामान्यांना कुंभमेळा म्हणजे नेमके काय आणि तो का भरवला जातो, हे समजावून सांगाल का?**

**महंत :** सिंहस्थ कुंभमेळा हे सनातन धर्माचे अतिप्राचीन आणि महान पर्व आहे. नाशिक आणि उज्जैन येथे याला 'सिंहस्थ' म्हटले जाते, तर प्रयागराज आणि हरिद्वार येथे 'कुंभमेळा' असे संबोधले जाते. इतिहास आणि पुराणांतील कथांनुसार, समुद्रमंथनातून बारा रत्ने प्राप्त झाली. त्यामध्ये अमृतकलशाचा समावेश होता. हरिद्वार, प्रयागराज, उज्जैन आणि नाशिक या चार ठिकाणी अमृताचे थेंब पडल्याची मान्यता आहे. या परंपरेनुसार हरिद्वार येथे गंगेच्या तीरावर, प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर, नाशिक येथे गोदावरीच्या तीरावर आणि उज्जैन येथे क्षिप्रा नदीच्या तीरावर कुंभपर्व साजरे केले जाते. आपल्या संतांनी, महापुरुषांनी आणि आचार्यांनी ही परंपरा अनादिकाळापासून जपली आहे. आजही त्याच परंपरेचे पालन करून कुंभमेळा आयोजित केला जातो. आखाडे या परंपरेच्या जतनात महत्त्वाची भूमिका बजावतात, तर शासन आणि प्रशासन त्यासाठी सहकार्य करते. प्रयागराज येथे कुंभमेळा थंडीच्या काळात, तर हरिद्वार आणि उज्जैन येथे उन्हाळ्यात होतो. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा सिंहस्थ पावसाळ्यात, म्हणजे श्रावण महिन्यात होतो. अमृतबिंदू पडल्याच्या पौराणिक मान्यतेशी या पर्वाचा संबंध आहे.



नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा

**प्रश्न : भारतात विविध ठिकाणी कुंभमेळे होतात. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या सिंहस्थाचे वेगळेपण काय आहे?**

**महंत :** नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा कुंभमेळा भौगोलिक परिस्थितीमुळे इतर कुंभमेळ्यांपेक्षा वेगळा आहे. प्रयागराज येथे तो थंडीच्या काळात, हरिद्वार आणि उज्जैन येथे उन्हाळ्यात, तर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पावसाळ्यात होतो. पूर्वी शैव आणि वैष्णव असे दोन्ही संप्रदाय एकत्र कुंभमेळा साजरा करत होते. मात्र, काही कारणांमुळे त्यांच्यात वाद झाले. त्यानंतर पेशवेकाळात दोन्ही संप्रदायांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. शैव पंथासाठी त्र्यंबकेश्वर येथे कुशावर्त कुंड, तर वैष्णव पंथासाठी नाशिकमध्ये रामकुंड आणि रामतीर्थ येथे स्नानाची व्यवस्था करण्यात आली. त्र्यंबकेश्वर येथे दहा आखाडे असतात, तर वैष्णवांचे

(सविस्तर मुलाखत पान ८ वर)

**संपूर्ण व्हिडिओ पाहण्यासाठी**
क्यू-आर कोड स्कॅन करा



# कर्करोगावरील औषधांच्या सुधारित किमती ९ नोव्हेंबरपासून

**पणजी :** गोवा राज्य किंमत देखरेख आणि संसाधन युनिटमार्फत व्यापार मार्जिन सुसूत्रीकरण (टीएमआर) लागू केल्यानंतर, ओळखण्यात आलेल्या १३७ अनुसूचीबाह्य कर्करोगविरोधी औषधांच्या सुधारित किमती ९ नोव्हेंबरपासून लागू होणार आहेत.

रसायन आणि खते मंत्रालयाच्या औषधनिर्माण विभागांतर्गत कार्यरत राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (एनपीपीए) औषधांमधील व्यापारी नफा तर्कसंगत करून ती रुग्णांना परवडणारी व्हावीत, यासाठी केलेल्या शिफारशीनुसार हा उपक्रम राबवण्यात येत आहे. ओळखण्यात आलेल्या औषधांमधील व्यापारी नफ्याचे नियमन करणे आणि औषधनिर्माण क्षेत्रातील किंमतविषयक नियमांचे पालन अधिक प्रभावी करणे, हा या उपाययोजनेचा उद्देश आहे. यामुळे कर्करोगाच्या उपचारांचा आर्थिक भार कमी होण्यास आणि अत्यावश्यक कर्करोगविरोधी औषधांची उपलब्धता सुधारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे.

उत्पादकांना २६ ऑक्टोबरपर्यंत सुधारित कमाल किरकोळ किमतीचा (एमआरपी) तपशील एनपीपीए आणि संबंधित राज्य औषध नियंत्रकांकडे सादर करावा लागेल. तसे न केल्यास, जास्त आकारलेली रक्कम वसूल करण्यासाठी एनपीपीए कारवाई करू शकते.

### किंमत प्रदर्शित करणे बंधनकारक

- किरकोळ विक्रेते, वितरक, रुग्णालये आणि संस्थांना उत्पादकांनी दिलेल्या किंमत सूची व पूरक किंमत सूची ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक असेल. ही माहिती मागणी करणाऱ्या कोणालाही उपलब्ध करून द्यावी लागेल.